व्यवसाय मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यास व व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन पदवीका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः डायट २०१८/(४०/१८) प्रशिक्षण.

मंत्रालय, मुंबई ४०००३२,

दिनांक: २४ ऑगस्ट, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय क्र.संकीर्ण ४२१७/(९३/२०१७)/ प्रशिक्षण/ दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७

प्रस्तावना:

दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन विभाग महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे, येथे सुरु करण्यात आलेला आहे. राज्यातील माध्यमिक स्तरावरील मुलांना व्यवसाय मार्गदर्शन व मानसशास्त्रीय समुपदेशन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्थेमध्ये "व्यवसाय मार्गदर्शन कक्ष" कार्यान्वित करणे त्याचप्रमाणे व्यवसाय मार्गदर्शन व मानशास्त्रीय समुपदेशन पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

प्रत्येक जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्थेमध्ये व्यवसाय मार्गदर्शन कक्ष कार्यान्वित करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अविरत अभ्यासक्रमांचा पहिला स्तर पूर्ण करणाऱ्यांस करीअर विज्ञ प्रमाणपत्र व ४ स्तर पूर्ण करणाऱ्यास पदविका (Diploma) म्हणून मान्यता देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०८२४१२५३२९९८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Baban Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Deptrtment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2018.08.24 12:55:02 +05'30'

(बी.आर. माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. राज्यपालांचे सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
३. मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,यांचे विशेष कार्य अधिकारी.

४. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव.
५. मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व महानगरपालिका आयुक्त.
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१०. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
११. शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे .
१२. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्याप्राधिकरण) पुणे.
१३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१४. निवड नस्ती, प्रशिक्षण.
१५. प्राचार्य सर्व जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्था(DIECPD).